युवाराष्ट्र दर्शन
# गोंदिया जिल्हा
बुधवार, ४ फेब्रुवारी २०२६

**वार्ताहर व एजेन्सी नियुक्ती करणे आहे**
मराठी लोकप्रिय दै. युवाराष्ट्र दर्शन करिता गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, तिरोडा, गोंदया क्षेत्रात वर्तमान पेपरच्या एजेन्सी व वार्ताहर करिता संपर्क साधा मो. ९५१८९३४०९६

**युवाराष्ट्र दर्शन, गोंदिया जिल्हा कार्यालय**
जिल्हा प्रतिनिधी मुकेश कुमार मिश्रा, कार्यालय पत्ता मनोहर चौक, गोविंदपूर रोड बग्गा कॉम्प्लेक्सच्या जवळ गोंदिया, ता. जि. गोंदिया बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क करा मो./व्हॉटअप नं. ९१७५२८३७४०

# सौंदड येथील धम्मदीक्षा सोहळा ठरला ऐतिहासिक

## हजारो बांधवांनी घेतली धम्मदीक्षा






**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**सडक अर्जुनी :** तालुका बौद्ध समाज संघ सडक अर्जुनी जिल्हा गोंदिया तर्फे धम्म साधना बौद्ध विहार सौंदड येथे धम्मदीक्षा सोहळा आयोजीत करण्यात आला होता . या ऐतिहासिक धम्मदीक्षा सोहळ्यात हजारो नागरिकांनी उपस्थिती लावून महाथेरो भदंत ज्ञानज्योती तसेच भंते नागसेन, भंते नागज्योती ,भंते नागसेन नागपूर, भिक्षणी धम्मकायां भंडारा यांचे प्रमुख उपस्थितीत बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यामुळे हा धम्मदीक्षा सोहळा केवळ तालुक्यासाठी नव्हे तर जिल्ह्यासाठी एक ऐतिहासिक ,सोहळा ठरला.

सौंदड येथील धम्मदीक्षा सोहळ्याचे अवचित्य साधून तालुका बौद्ध समाज संघाच्या कार्यालयाचे व पतसंस्थेचे उद्घाटन शेंडा रोड सडक अर्जुनी येथे भंते यांचे हस्ते करण्यात आले. त्यानंतर सडक अर्जुनी येथील संबोधी बुद्ध विहार येथून धम्म रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून दुचाकी वाहनांना पंचशील रश्मी ध्वज लावून रॅलीत हजारो समाज बांधव सहभागी झाले होते .ही धम्म रॅली कोहमारा मार्गे सौंदड येथील संविधान चौकात पोहोचताच संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णकृती पुतळ्याला भदंत धम्मज्योती यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. धम्मसाधना बुद्ध विहारात रॅली पोहोचताच तालुका बौद्ध समाज संघ पदाधिकाऱ्यांच्या वतीने भिक्खू संघाचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर बुद्ध वंदना घेण्यात आली .यानंतर तालुकास्तरीय बौद्ध विहार स्पर्धेचे पारितोषिक वितरित करण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक धम्मसाधना बुद्ध विहार सौंदड , द्वितीय क्रमांक धम्मज्योती बुद्ध विहार पुतळी, तृतीय क्रमांक पंचशील बुद्ध विहार शेंडा, या शिवाय त्रिरत्न बुद्ध विहार राका व तथागत बुद्ध विहार कोकणा यांनी प्रोत्साहन पर पारितोषिक प्राप्त केल्याबद्दल बुध्दविहार समिती पदाधिकाऱ्यांचा रोख राशी , स्मृतिचिन्ह व बुद्ध आणि त्याचा धम्म ही पुस्तिका देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. भिकू संघाच्या वतीने धम्मदेशना देण्यात आली. व लगेच महाथेरो भदंत ज्ञानज्योती यांच्या हस्ते हजारो बांधवांना धम्मदीक्षा देण्यात आली. हा ऐतिहासिक धम्मदीक्षा सोहळा यशस्वी करण्यासाठी तालुका बौद्ध समाज संघाचे सर्व पदाधिकारी, तालुका मार्गदर्शक मंडळाचे पदाधिकारी, तालुका बौद्ध समाज संस्कार विधी समिती, शिक्षण व संविधान जागृती समिती तसेच तालुका बौद्ध समाज संघ अंतर्गत येणाऱ्या विविध समित्यांचे पदाधिकारी यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक तालुका बौद्ध समाज संघाचे अध्यक्ष महेंद्र चंद्रिकापुरे यांनी केले असून प्रास्ताविकातून तालुका बौद्ध समाज संघाची भूमिका विशद केली. संचालन तालुका बौद्ध समाज संघाचे मार्गदर्शक अनिल मेश्राम यांनी तर आभार दीक्षा समिती प्रमुख अशोक लांजेवार यांनी मानले. या धम्मदीक्षा सोहळ्याला तालुक्यासह इतर जिल्ह्यातील नागरिकांनी सुद्धा मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

# संत तुकाराम महाराज जयंती उत्साहात



**गोंदिया :** आज सिव्हील लाईन्स अंतर्गत नूतन महाविद्यालय यथे चद्रंभान तरोणे च्या पुढाकाराने संत तुकाराम महाराज जयंती साजरी करण्यात आली, कार्यक्रमास प्रमुख अतिथी स्वरूप नगराध्यक्ष सचिन शेंडे,दुलिचंदराव बुद्धे, सविताताई बेदरकर, मनोजभाऊ मेंढे, अमृत इंगले, निलम हलमारे, अशोक हमणे, प्रमोद गुडघे, ठवरेजी, कैलास भेलावे, सह अनेक मान्यवर उपस्थित होते, सविताताई बेदरकर कडून खूप सखोल प्रकाश माहाराजा च्या जिवणावर टाकणयात आला तसेच बुद्धेकडून मुलांना मार्गदर्शन केले गेले. संचालन चंद्रभान तरोणे कडून करण्यात येऊन आभार मनोजभाऊ मेंढे कडून करण्यात आले.

# राष्ट्रीय गोडियन सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**आमगाव :** सालेकसा तालुक्यातील धनेगाव येथील आदिवासी बांधवांचे औराध्य दैवत कचारगड गुहेत ५ दिवसीय यात्रा सुरू आहे. दरम्यान राष्ट्रीय गोंडी धर्मभूमी पारी कोपार लिंगो माँ काली कंकाली देवस्थान येथे राष्ट्रीय गोंडवाना महाअधिवेशन व राष्ट्रीय गोडियन सांस्कृतिक महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले. यावेळी भोजन व्यवस्थापन समिती स्वयंसेवक व कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. आदिवासी समाजाची समृद्ध परंपरा, संस्कृती व अस्मिता जपण्यासाठी येणाऱ्या पिढ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक व राजकीयदृष्ट्या सक्षम करणे अत्यंत आवश्यक आहे, असे ठाम प्रतिपादन दुष्यात किरसान यांनी केले आहे. यावेळी खासदार खासदार डॉ. प्रशांत पडोळे, अॅड.विश्वजीत कोवासे, जि.प.सदस्य उषा मेंढे, विमल कटरे, वीणा कटरे, रमेश ताराम, दशरथ मडावी, विजय फुडे, ओमप्रकाश लिल्हारे, संतोष बोहरे, अर्चना मडावी, भारतीताई सलामे, भुमेश्वर मेंढे, रमेश चौधरी रजनीकांत मोठघरे, नदीम नाथांनी, आशुतोष असाटी, अभय ढेंगे, सीताराम हुमणे, राहुल चुटे, राजसिंग परिहार, कुणाल शेंडे तसेच इतर अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अजित दादांच्या आठवणींनी गोंदिया हेलावले



## अस्थी कलशाचे नागरिकांनी घेतले दर्शन

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**गोंदिया :** राजकारणातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व आणि राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या निधनाने आपल्या लाडक्या नेत्याच्या पावन स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि त्यांच्या अस्थींचे अंतिम दर्शन घेण्यासाठी आज संपूर्ण गोंदिया जिल्हा भावूक झाला होता. बारामती येथून विशेष सन्मानाने आणण्यात आलेला त्यांचा पवित्र अस्थी कलश आज गोंदिया नगरीत दाखल झाला, तेव्हा हजारो नागरिकांनी आपल्या लाडक्या 'दादां'ना साश्रू नयनांनी अभिवादन केले.

स्व. अजित पवार यांचा अस्थी कलश आज राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी भवन, रेलटोली कार्यालय, गोंदिया येथे दर्शनासाठी ठेवण्यात आला. बारामतीवरून कलशाचे आगमन होताच उपस्थित कार्यकर्त्यांनी 'अजित दादा अमर रहे' अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले नागरिक, शेतकरी, महिला आणि युवक कार्यकर्त्यांनी आपल्या नेत्याचे अंतिम दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती. अजित दादांचे गोंदिया जिल्ह्याशी असलेले जिव्हाळ्याचे नाते आणि त्यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी दिलेले योगदान यावर उपस्थित मान्यवरांनी प्रकाश टाकला. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या जिल्हा कार्यालयात अत्यंत शोकाकुल वातावरणात हा दर्शन सोहळा पार पडला. अनेकांना आपल्या लाडक्या नेत्याच्या आठवणींनी अश्रू अनावर झाले होते. शिस्तप्रिय आणि कामाचा झपाटा असलेल्या या नेत्याच्या जाण्याने जिल्ह्याचे मोठे नुकसान झाल्याची भावना माजी आमदार राजेंद्र जैन, आमदार विनोद अग्रवाल, आमदार राजकुमार बडोले व उपस्थित मान्यवर यांनी यावेळी व्यक्त करण्यात आली. स्व. अजित दादांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा आणि त्यांनी आखून दिलेली विकासकामे पूर्ण करण्याचा निर्धार यावेळी जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. या अस्थी कलश दर्शन सोहळ्यामुळे संपूर्ण गोंदिया जिल्हा आज आपल्या लाडक्या नेत्याच्या आठवणीत हरवून गेला होता.

## रजेगावच्या कोरणी घाटावर स्व. अजित पवारांच्या स्मृती विलीन

सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत गोंदियाच्या राष्ट्रवादी भवन येथे अस्थी कलश दर्शन आटोपल्यानंतर, हा पवित्र अस्थी कलश शोक यात्रेच्या स्वरूपात रजेगावच्या दिशेने रवाना झाला. रजेगाव येथील कोरणी घाटावर अस्थी कलश पोहोचताच वातावरण अधिकच गंभीर झाले. वैनगंगा नदीच्या तीरावर मंत्रोच्चारांच्या घोषात आणि पूर्ण धार्मिक विधीनुसार अस्थींचे पूजन करण्यात आले. त्यानंतर या पवित्र अस्थींचे वैनगंगेच्या पवित्र पात्रात विसर्जन करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील नागरिकांनी कोरणी घाटावर गर्दी केली होती. आपल्या लाडक्या नेत्याच्या स्मृती वैनगंगेच्या प्रवाहात विलीन होताना पाहून अनेकांना अश्रू अनावर झाले. 'दादांच्या रूपाने विकासाचा एक अध्याय संपला असला, तरी त्यांचे विचार या मातीत सदैव जिवंत राहतील,' अशी भावना यावेळी माजी आमदार राजेंद्र जैन, आमदार राजकुमार बडोले व उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

# शेंडा येथील सागवान लाकूड तस्करी

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**सडक अर्जुना :** मालकी प्रकरणातील वनोउपजास वाहतूक परवाना जारी करताना सबंधित कर्मचारी उपस्थित राहणे आवश्यक असताना शेंडा येथील सांगून लाकूड तस्करी प्रकरणात नेमके काय घडले? ? याला जबाबदार कोण? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित करण्यात येत असून जबाबदार अधिकारी कर्मचाऱ्यावर वनविभाग काय कारवाई करते याकडे तालुका वाशी यांचे लक्ष लागले आहे.

प्राप्त माहितीनुसार सडक अर्जुनी वनपरिक्षेत्रांतर्गत शेंडा (कोयलारी) येथून नागपूर (कापसी) येथे ट्रक मधून सागवान लाकूड भरून जात असल्याची माहिती लाखनी येथील वन विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळताच लाखनी येथे सदर वाहन अडवून वाहनाची चौकशी केली असता वाहनात वाहतूक परवान्यानुसार अधिकचे लाकडे आढळून आल्याने लाकूड भरलेले वाहन ताब्यात घेऊन वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला व चौकशी सुरू केली आहे. उपवनसंरक्षक गोंदिया वन विभाग गोंदिया यांचे पत्र कक्ष ३/शि.ली१/मालकी प्रकरण/ २०२५-२६/३००६ दिनांक २२ जानेवारी २६ च्या पत्रानुसार मालकी प्रकरणातील वन उपजास वाहतूक परवाना जारी करताना संबंधित कर्मचारी उपस्थित न राहता वाहतूक परवाना जारी करतात. सदर प्रकरणातही वन उपज वाहतूक करताना अवैध वन वाहतूक करताना आढळले आहे. वाहतूक परवाना आदेशातील नमूद वन उपजापेक्षा जास्त वनोउपज आढळून आल्यास संबंधित कर्मचाऱ्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत कारवाई करण्यात येईल असे नमूद आहे. शेंडा येथील सागवान लाकूड तस्करी प्रकरणात जारी परवाण्यापेक्षा अधिक लाकडे आढळल्याने या नेमका दोष कुणाचा असा सवाल सर्वसामान्य नागरिकांनी उपस्थित केला आहे.

## वन विभागाच्या कारवाईकडे लक्ष

सडक अर्जुनी वनपरिक्षेत्रातील शेंडा सहवन क्षेत्रात मागील वर्षभरात सागवान वृक्षकटाई व वाहतूक प्रकरण उघडकीस आले असून अशाच एका प्रकरणा तत्कालीन क्षेत्र सहाय्यक यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती त्याच धर्तीवर आता सदर प्रकरणी जबाबदार वन अधिकारी कर्मचाऱ्यावर कोणती कारवाई करते याकडे तालुका वाशी यांचे लक्ष लागले आहे.

# पोटनिवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर

**गोंदिया :** राज्य निवडणूक आयोगाचे २९ जानेवारी २०२६ चे पत्रान्वये जिल्ह्यातील दिनांक ३१ जानेवारी २०२६ पर्यंत निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील सदस्य/थेट सरपंचाच्या रिक्त झालेल्या जागांच्या पोटनिवडणुकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर झालेला आहे. त्यानुसार मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक १ जुलै २०२५ आहे. प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक सोमवार १६ फेब्रुवारी २०२६, हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी सोमवार १६ फेब्रुवारी ते शुक्रवार २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत. प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक मंगळवार २४ फेब्रुवारी २०२६. असे उपजिल्हाधिकारी (सामान्य) मानसी पाटील यांनी कळविले आहे.

# नेशनल आर्चरी जजेश वर्कशॉपमध्ये अमनची निवड



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**गोंदिया :** ६ ते ९ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मडगाव-गोवा येथे भारतीय तिरंदाजी संघटना द्वारे ४ दिवसीय राष्ट्रीय जजेस वर्कशॉप आयोजित करण्यात आले आहे .करिता यात भारतातून गोवा,महाराष्ट्र, मध्यप्रदेश, दिऊ-दमन , राजस्थान, गुजरात या राज्याचा समावेश आहे .या मधे महाराष्ट्रातील १० प्रशिक्षकांचा समावेश राहणार आहे यात गोदिया जिल्यातील तिरोडा तालुका येथील आर्चरीया खेळाचे राष्ट्रीय प्रशिक्षक, तालुका क्रीडा संयोजक तथा क्रीडा मार्गदर्शक श्री.अमन हंसराज नंदेश्वर यांची निवड करण्यात आली आहे.

निवळ झाल्या बद्दल आ. विजय रहांगडाले , नगराध्यक्ष अशोक असाटी, उपध्यक्ष राजेस गुन्हेरिया, विजय बन्सोड, ओमकांता रंगारी, अनुप बोपचे, प्रदीप मेश्राम, सुरेश शहारे, दीपक घरजारे, विकेश मेश्राम, चंदप्रकाश प्रजापती, आकाश शहारे, राजेश वरठे ,अमोल चाचणे प्रणय नांदगये,शुभम गोंधुळे, निखिल शेंडे,राहुल देशमुख, अमन बैरीसाल, अतुल बिनझाडे, रुपेश साखरे , अंशुल मेश्राम,प्रज्वल वैद्य, प्रशिक वैद्य, सचिन सरदे यांनी शुभेच्छा दिल्या.

# जिल्हा योगासन स्पोर्ट्स असो.द्वारे 'सूर्यनमस्कार अभियान'



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**आमगाव :** महाराष्ट्र राज्य योगासन स्पोर्ट असोसिएशन च्या मार्गदर्शनाखाली जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशन द्वारे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात शाळा, कॉलेज आणि अन्य स्थानांवर 'सूर्यनमस्कार' चे प्रात्यक्षिक, सराव, स्पर्धा अशा विभिन्न माध्यमातून 'सूर्यनमस्कार अभियान' राबविण्यात येणार आहे. सूर्यनमस्कार मध्ये आसन, प्राणायाम या गोष्टींचा समावेश होतो. सूर्यनमस्कार हा बलोपासनेसाठी करण्यात येणारा सर्वांगसुंदर व्यायाम प्रकार आहे.जिल्हा संघटना दरवर्षी सूर्यनमस्कार स्पर्धा व योगासन स्पर्धांच्या माध्यमातून सूर्यनमस्कार व योगासनचा प्रचार प्रसार करण्याचे कार्य करत असते.

केंद्रीय व राज्य संघटनेच्या निर्देशानुसार यावर्षी 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती १९ फेब्रुवारी पर्यंत' हे अभियान राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील संघटनेच्या सर्व कार्यकर्त्यांनी आपल्या तालुक्यात हे अभियान राबवावे असे आवाहन गोंदिया जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष सुरेश कोसरकर, उपाध्यक्ष दादासाहेब फुंडे, सचिव विनायक अंजनकर, सहसचिव शशांक कोसरकर, लक्ष्मण चव्हाण, आनंद मकवाना,दिव्या भोजवानी, चेतना नागपुरे, प्रिया राणे, सुमती डोलारे, रविशंकर नागपुरे, माधुरी पिलारे, डॉक्टर वैभव परतेके, क्रांतीकुमार बोरकर, मारबते मॅडम, अनिरुद्ध कनोजे, रंजना ब्राह्मणकर, दिपाली कठाने, हेमंत चावके, ललित पटले, मुकुल अग्रवाल, सीमा नागपुरे, डॉक्टर शिवांगी पांडे, मोहनीश खैरवार, शालिनी राखडे आणि अन्य सर्व सदस्यांनी केले आहे.

# गोंडी संस्कृतीच्या जतनासाठी शासन कटिबद्ध : डॉ. अशोक उईके

## कचारगड यात्रेत लाखो भाविकांची उपस्थिती



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**सालेकसा :** गोंडीयन संस्कृतीचे रचनाकार पारी कुपार लिंगो, ३३ कोट सगापेन, १२ पेनचे ७५० गोत्र, रायताळ जंगो, संगीत सम्राट हिरासुका पाटालीर, शंभूशेक तसेच माँ काली कंकाली व सल्लाशक्ती यांच्या पावन भूमीच्या दर्शनासाठी दरवर्षी लाखो भाविक कचारगड येथे माघ पौर्णिमेपासून सुरू होणाऱ्या पाच दिवसांच्या यात्रेत सहभागी होतात. यावर्षी ही यात्रा ३० जानेवारी ते ०३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पार पडत आहे. या निमित्ताने राष्ट्रीय गोंडवाना महाअधिवेशन व महागोंगोना गोंडीपुनेम महासम्मेलन, जनजाती चेतना समिती, गोंदिया यांच्या वतीने कचारगड येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. उईके म्हणाले, 'कचारगड ही आदिवासी समाजाची पवित्र भूमी असून येथे भाविक मोठ्या श्रद्धेने येतात. आदिवासी समाजाची गौरवशाली संस्कृती आहे आणि तिचे जतन करणे हे आपले कर्तव्य आहे. जल, जमीन व जंगलाचे संवर्धन आदिवासी समाजाने केले आहे. शासन प्राचीन संस्कृती, भाषा, कला व परंपरेच्या संवर्धनासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल. शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत. आदिवासी बांधवांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि कचारगडच्या विकासासाठी शासन स्तरावर पूर्ण सहकार्य दिले जाईल.'

यावेळी माजी आमदार देवराव होळी, जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, धनेगाव सरपंच सिंधू घरत, जिल्हा परिषद सदस्य सविता पुराम, उपविभागीय अधिकारी कविता गायकवाड, प्रकल्प अधिकारी उमेश काशिद यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. आदिवासी विकास विभागातील विविध योजनांची माहिती अनुसूचित जमातीच्या नागरिकांपर्यंत पोहोचावी, यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, देवरी मार्फत योजनांच्या बॅनरसह तीन माहिती सुविधा कक्ष उभारण्यात आले होते. कचारगड हे गोंडी समाजाचे प्राचीन श्रद्धास्थान असून, येथील नैसर्गिक गुहेत पारी कुपार लिंगो यांच्या कथेनुसार गोंड समाजाच्या उगमाची आख्यायिका जोडली जाते. माघ पौर्णिमेच्या सुमारास (कोया पुनेम) भरविण्यात येणाऱ्या या यात्रेत गोंडी संस्कृती, नृत्य, संगीत यांचा महोत्सव साजरा केला जातो. या पवित्र स्थळाच्या विकासासाठी शासनाकडून विशेष लक्ष दिले जात आहे.

**जाहीर सुचना**

होल्डर श्री. देवचंद अपाईसाव बडघरे इनके नाम से नगर परिषद रिकार्ड में नाम दर्ज है। जिसका वार्ड क्र. ३५, वार्ड का नाम आंबेडकर वार्ड, मालमत्ता क्र.३५/४४० है। उक्त मालमत्ता धारक का निधन दि.०१/०७/२००७ को हो चुका है। इनके निधन उपरांत इनके वारसान १) श्रीमती त्रिवेणी देवचंद बडघरे, २) श्री.अरुण देवचंद बडघरे इन्होने वारसान आधार पर हस्तांतरण हेतु आवेदन सादर किया है। हस्तांतरण पर यदी आक्षेप हो तो वह सुचना प्रकाशीत होने के पश्चात १५ दिन के भितर अपना आक्षेप इस कार्यालय में प्रमाणीत दस्तावेज सहित सादर करेंगे। आक्षेप प्रापप्त न होने पर हस्तांतरण की कारवाई की जायेगी।

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, गोंदिया**

**जाहीर सुचना**

श्रीमती शिलाबाई बे. पति सुखराम हरडे इनके नाम से नगर परिषद रिकार्ड में नाम दर्ज है। जिसका वार्ड क्र. १०, वार्ड का नाम शास्त्री वार्ड, मालमत्ता क्र.१०/७/१०/११ है। उक्त मालमत्ता धारक का निधन दि.२३/१०/२०२५ को हो चुका है। इनके निधन उपरांत इनके वारसान १) श्री. कपिल सुखराम हरडे, २) श्री. नितीन सुखराम हरडे इन्होने वारसान आधार पर हस्तांतरण हेतु आवेदन सादर किया है। हस्तांतरण पर यदी आक्षेप हो तो वह सुचना प्रकाशीत होने के पश्चात १५ दिन के भितर अपना आक्षेप इस कार्यालय में प्रमाणीत दस्तावेज सहित सादर करेंगे। आक्षेप प्रापप्त न होने पर हस्तांतरण की कारवाई की जायेगी।

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, गोंदिया**

**जाहीर सुचना**

श्री. हेमंत व. अनंतराम रहांगडाले इनके नाम से नगर परिषद रिकार्ड में नाम दर्ज है। जिसका वार्ड क्र. २१, वार्ड का नाम शिवाजी वार्ड, मालमत्ता क्र.२३४ है। उक्त मालमत्ता धारक का निधन दि.१६/०४/२०२१ को हो चुका है। इनके निधन उपरांत इनके वारसान १) सविता हेमेन्द्र रहांगडाले, २) कौशिक हेमेंद्र रहांगडाले, ३) श्रीया हेमेंद्र रहांगडाले इन्होने वारसान आधार पर हस्तांतरण हेतु आवेदन सादर किया है। हस्तांतरण पर यदी आक्षेप हो तो वह सुचना प्रकाशीत होने के पश्चात १५ दिन के भितर अपना आक्षेप इस कार्यालय में प्रमाणीत दस्तावेज सहित सादर करेंगे। आक्षेप प्रापप्त न होने पर हस्तांतरण की कारवाई की जायेगी।

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, गोंदिया**

**जाहीर सुचना**

आम जनता को सूचित किया जाता है कि मेरे पक्षकार जना स्माल फायनान्स बँक श्री किशोर कुमार बिसराम शिवणकर एवं पद्मा किशोरकुमार शिवणकर को उनकी मालमत्ता पर अर्ज दे रहे है,
**मालमत्ता का वर्णन इस प्रकार है-**
मौजा- इसनाटोला, त.सा.क्र. ११ वाई नं ३ त. सालेकसा, जिल्हा गोंदिया ग्रामपंचायत गिरोला मालमत्ता नं. ७१०/एरिया २००० चौ. फूट
जनता को सूचित किया है कि उपरोक्त मालमत्ता श्री किशोरकुमार बिसराम शिवणकर एवं पद्मा किशोरकुमार शिवणकर जी को विरासत में इनके पुर्वजो से मिली है एवं उपरोक्त वर्णित मालमत्ता श्री किशोरकुमार बिसराम शिवणकर पद्मा किशोरकुमार शिवणकर के नाम पर दर्ज है।
जनता को सुचित किया जाता है उपरोक्त वारसात मालमत्ता पर किसी का भी, किसी भी प्रकार का हस्तक्षेप हो तो १५ दिन के अंदर लिखित में सुचित करे, १५ दिन बाद कोई की हस्तक्षेप स्विकार नही किया जायेगा।
**स्थान- गोंदिया**
**दि ३०/१/२६**

**दीपक प्रेमचंद मुलचंदानी**
**(वकिल)**
**सिंधी स्कुल के पास**
**९३०७२४८८२२**

**जाहीर सुचना**

१) यह कि श्री पराग सुनिल अग्रवाल जी ने स्टेट बँक ऑफ इंडिया गोंदिया से लोन लिया है।
२) यह कि लोन से संबंधित रजिस्टर्ड विक्रि पत्र जिसका जिसका विक्री पत्र deed no.4885/2014 यह स्टेट बैंक में जमा थी
३) यह कि, सन २०२२-२०२३ में बँके के दस्ताऐवज RACC शाखा में HLC शाखा में भेजे गया। जिसके बाद से उक्त बित्री पत्र (Sale Deed) की ओरिजनल (original) कॉपी मिल नही रही है
४) यह कि ओरिजनल बिक्री पत्र (Sale Deed) गुम होने के बाबत गोंदिया सिटी मालिस स्टेशन में online जानकारी दि. ३०/०१/२०२६ को दी जा चुकी है
आम जनता को यदी इस ओरिजनल सेल डिड जिसका दस्त क्र. ४८८५/२०१४ एवं दि. ०५/०९/१४ है। इस बारे में जानकारी मिलती है तो ३० दिने के अंतर लिखित में सुचित करे

**दीपक प्रेमचंद मुलचंदानी**
**(वकिल)**
**सिंधी स्कुल के पास**
**९३०७२४८८२२**

**जाहीर सुचना**

आम जनता को सुचित किया जाता है मेरे पक्षका 'स्टेट बँक ऑफ इंडिया कु. वैगली सुरेशराव धुल (शादी के पहले का श्रीमती वैशाली प्रविण इन्दुरकर (शादी के बाद का नाम) इनको निचे दि हुई मालमत्ता खरेदी करणे हेतु अर्ज दे रही है,
मालमत्ता का वर्णन इस प्रकार है
मौजा- कटंगीकला त.सा.क्र.४१ थान नं. ७४ त. जि.गोंदिया गट नं. २२२/१, एरिया टोटल -0.01 HR 59 sq. meter (Net Area-89-05 sq. meter)
जनता को सूचित किया किया जाना है उपरोक्त मालमत्ता धनवंता दिनदयाल उके एवं रिटाबाई राजेश के नाम पर दर्ज है एवं जिसका रजिष्ट्री दस्त क्र. ४८२६/२०२३ एवं दिनांक १४/९/२३ है। यह कि उपरोक्त रजिष्ट्री में पेल में १९ यह गुम गया है एवं कहीं मिल नही रहा है। यह कि उपरोक्त दी हुई राजिष्ट्री के पेज १९ बाबाद यह सूचना पत्र जारी किया जा रहा है
**स्थान- गोंदिया**
**दि ३०/१/२६**

**दीपक प्रेमचंद मुलचंदानी**
**(वकिल)**
**सिंधी स्कुल के पास**
**९३०७२४८८२२**

युवाराष्ट्र दर्शन

# भंडारा जिल्हा

बुधवार दि.०४ फेब्रुवारी २०२६

## श्री संत लहरीबाबा स्मृती सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**भंडारा :** श्री संत जैरामदास उर्फ लहरीबाबा यांच्या स्मृती सोहळ्या निमित्त लहरी आश्रम कामठा (मध्यकाशी) शाखा भंडारा येथे विविध धार्मिक, सांस्कृतिक व आरोग्य निदान व नेत्ररोग शिबिराचे आयोजन करण्यात आले.

दोन दिवसाच्या कार्यक्रमात लहरी आश्रमचे अध्यक्ष व पिठाधीश परमपुज्य डॉ खिलेश्वरनाथ उर्फ तुकडोजी बाबा यांच्या प्रमुख उपस्थितीत ज्योत प्रज्वलन, महामृत्यूंजय यज्ञ व चंद्रपूर, वडसा, राका, बालाघाट, गोंदिया, नागपूर, अमरावती, भंडारा येथील महिला भजन मंडळांनी भजन प्रस्तुती केली. आरोग्य व नेत्ररोग शिबिरमध्ये डॉ. अजय पटले, डॉ. प्रशांत राऊत, डॉक्टर मेघा गोन्नाडे, डॉ. लाडे, डॉ. लांजेवार, डॉ. जाधव यांनी तीनशे रुग्णांना तपासणी केले व लहरीबाबा आश्रम ट्रस्टतर्फे रुग्णांना औषधी व चष्मे मोफत वाटप करण्यात आले. प्रमुख पाहुणे भंडारा नगर परिषद अध्यक्षा मधुरा मिलिंद मदनकर, नगरपरिषर सदस्या उषा नंदनवार, उर्मिला ब्राह्मणकर उपस्थित होते. तसेच गोविंद शेंडे मेश्राम, गोपालजी मते, अॅड.अनिल ठाकरे, अॅड. संजय धोटे चंद्रपूर, संजयजी ताळे आदि उपस्थित होते

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकारीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

### घनकचरा कंत्राट संपल्याचा फटका मोहाडी नगरवासियांच्या मानगुटीवर...

# नगर विकास संघर्ष समिती करणार नगर पंचायत समोर कचरा फेको आंदोलन



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**मोहाडी:** मोहाडी नगर पंचायत नेहमीच आपल्या गलथान कारभारामुळे अख्ख्या महाराष्ट्रात प्रसिद्धीस आलेली आहे. या नगर पंचायती वर सर्व पक्षीय सत्ता असताना नेहमीच नवनवीन कारनामे प्रसिद्धीस येत असतात. असाच एक नविन प्रकार समोर आला आहे. घनकचरा टेंडर संपल्याने मोहाडी शहरात दररोज फिरणारी कचरा गाडी लुप्त झालेली आहे. जनतेच्या घरी कचरा साचलेला आहे, पण कचरा गाडी चा पत्ताच नाही. नगर विकास संघर्ष समिती ने नगर पंचायत मधून महिती घेतली असता घनकचरा टेंडर ची मुदत संपल्याने कचरा गाडी येऊ शकत नाही व नविन घनकचरा टेंडर काढण्याकरिता नगर पंचायत कडे निधी उपलब्ध नाही अशी महिती देण्यात आली.

ज्या घनकचरा टेंडर साठी गिधडा सारखे तुटून पडणारे ठेकेदार गप्प कसे? नियमात न बसताना सुध्दा नियमबाह्य टेंडर आधी देण्यात आले होते.१वर्ष पुर्ण करुण ही पुन्हा तारीख वाढवून देण्यात आली फक्त आणि फक्त कमिशन साठी करोडो रुपयांचा टेंडर वर तुटून पडणारे आज घडीला निधी नसल्याने गप्प कशे? नियमानुसार टेंडर संपण्याआधी प्रोसेस का करण्यात आली नाही? असा सवाल नगर विकास संघर्ष समिती ने व्यक्त केला आहे.

नगर पंचायत ने तातडीने याची दखल घेऊन कचरा गाडी नियमित सुरू करावी लोकांच्या घरात साचलेला कचरा गोळा करावा अन्यथा नगर विकास संघर्ष समिती मोहाडी नगरवासीयांना सोबत घेऊन नगर पंचायत समोर कचरा फेको आंदोलन करणार याची सर्वस्वी जबाबदारी शासन प्रशासनाची राहील असा इशारा जिल्हाधिकारी भंडारा यांना देण्यात आलेल्या निवेदनातुन दिला आहे.

निवेदन देणाऱ्यांमध्ये विकास संघर्ष समिती चे खुशाल कोसरे, बबलु सैय्यद, पुरुषोत्तम पात्रे, अनिल न्यायखोर, श्याम चौधरी, जयराम गायधने, आदर्श बडवाईक, हेमंत मेहर, रवी पाटील, गणेश सेलोकर, अनिल मांढरे, प्रकाश मारबते, नितीन निंबारते, हंसराज निमजे, अनिल टीचकुले, अमोल चोपकर, दीपक पात्रे, काशिनाथ रंभाड, थामदेव नीमजे यांचा समावेश आहे.

# रेती वाहतुकीच्या वाहनांमुळे नागरीकांचा जीव धोक्यात

- नगराध्यक्ष सागर गभने यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव
- शहरातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्याची मागणी



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**तुमसर :** तुमसर शहराच्या मुख्य बाजारपेठेतून आणि रहिवासी भागातून होणारी रेतीची ओव्हरलोड अवैध वाहतूक नागरिकांच्या जिवावर उठली आहे. या गंभीर प्रकारामुळे शहरात अपघातांचे प्रमाण वाढले असून, ही वाहतूक तातडीने बंद करून इतरत्र बायपास मार्गाने वळवावी, या मागणीसाठी तुमसर नगर परिषदेचे नगराध्यक्ष इंजि. सागर गभने यांनी सोमवारी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले.

गेल्या काही दिवसांपासून तुमसर शहरात रेती वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांनी धुमाकूळ घातला आहे. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नगराध्यक्षांनी प्रशासकीय ढिसाळपणावर बोट ठेवले आहे. शहराच्या मुख्य रस्त्यांवरून शेकडो ट्रक भरधाव वेगाने धावत असून, यामुळे सामान्य नागरिक, पादचारी आणि विशेषतः शालेय विद्यार्थ्यांच्या जिवाला मोठा धोका निर्माण झाला आहे.

नगराध्यक्ष इंजि.सागर गभने यांनी मागणी केली आहे की, तुमसर शहरांतर्गत अवजड वाहनांना कायमस्वरूपी बंदी घालण्यात यावी आणि ही वाहतूक बायपास मार्गे वळवण्यात यावी. तसेच ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्यांवर केवळ दंड न आकारता कठोर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. जर प्रशासनाने वेळेत पावले उचलली नाहीत आणि एखादी मोठी दुर्घटना घडली, तर त्याला सर्वस्वी प्रशासन जबाबदार असेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.या निवेदनाच्या प्रती पोलीस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी आणि आरटीओ भंडारा यांनाही माहिती व कार्यवाहीसाठी पाठवण्यात आल्या आहेत. आता जिल्हा प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण तुमसरवासीयांचे लक्ष लागले आहे.

**निवेदनातील प्रमुख मुद्दे**

**जीवघेणे अपघात :** भरधाव रेती ट्रकांमुळे शहरात अनेक भीषण अपघात झाले असून काहींना प्राण गमवावे लागले आहेत.

**विद्यार्थ्यांची सुरक्षा धोक्यात :** तुमसर हे शैक्षणिक केंद्र असल्याने हजारो विद्यार्थी सायकलने किंवा पायी प्रवास करतात. या अवजड ट्रकांमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

**रस्त्यांची दुरवस्था :** विहित मर्यादेपेक्षा जास्त रेती भरल्यामुळे शहरातील रस्ते अल्पावधीतच खराब होत आहेत.

**नियम धाब्यावर :** पर्यायी मार्ग उपलब्ध असतानाही चालक जाणीवपूर्वक शहरातून वाहने नेतात, याकडे आरटीओ विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

## नदीत पडल्याने एकाचा मृत्यू

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** तुमसर तालुक्यातील देव्हाडी रेल्वे पुलावर काम करीत असताना तोल गेल्याने मजूर वैनगंगा नदीपात्रात कोसळला. यात गंभीर जखमी झाल्याने त्याचा मृत्यू झाला. मसुद मुक्तारमीया हुसेन (१८, रा. जरलही भगवानपूर मालदा, प. बंगाल) असे मृताचे नाव आहे. ही घटना ३१ जानेवारीला सकाळी ८ वाजताच्या सुमारास घडली. पोलीस तपास करीत आहेत.

## सोमलवाडा येथील विद्यार्थ्यांचा रेल्वेतून पडून मृत्यू

**लाखनी :** तालुक्यातील सोमलवाडा येथील अभियांत्रिकी शिक्षण घेत असलेल्या प्रणय मोहन बुराडे (२१) नामक विद्यार्थ्याचा बडनेराजवळ रेल्वेतून पडून दुर्दैवी मृत्यू झाला. सदर घटना दि. ३० जानेवारी रोजी पहाटे दरम्यान घडली.

सोमलवाडा येथील प्रणय बुराडे हा पुणे येथील जीएसपीएम इंजिनिअरींग कॉलेज थातेवाडी येथे बीटेक तृतीय वर्षात शिक्षण घेत होता. २९ जानेवारी रोजी तो पुणे येथून आपल्या स्वगावाकडे रेल्वेने येत असताना ३० जानेवारी रोजी पहाटे दरम्यान बडनेराजवळ अचानक रेल्वेतून पडून दुर्दैवी मृत्यू झाला. त्याच्या पार्थिवावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार पार पडला. प्रणयच्या अपघाती मृत्यूने गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.



# संवेदनशील घटनांतून संशोधनास चालना मिळते!

- आंतरराष्ट्रीय संशोधक डॉ. संजय ढोबळे
- समर्थ महाविद्यालय, लाखनी येथे स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**लाखनी :** राष्ट्रीय शिक्षण संस्था, लाखनी द्वारा संचालित समर्थ महाविद्यालय, लाखनी येथे नुकताच स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. स्नेहमेळाव्याच्या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे विश्वस्त डॉ. उदयराव राजहंस होते. तर प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख, सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय संशोधक डॉ. संजय ढोबळे, बेरार फायनान्स लिमिटेड, नागपूरचे अध्यक्ष श्री. मारुती जवंजार तसेच राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे विश्वस्त अॅड. होमेश्वर रोकडे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. संजय ढोबळे म्हणाले की, 'विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारून संशोधनाकडे वळले पाहिजे. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांमधून संशोधनाची दृष्टी विकसित होत असते. समृद्धी महामार्गावरील अपघात असोत किंवा कोरोनामुळे निर्माण झालेली परिस्थिती असो, अशा संवेदनशील घटनांतूनही संशोधनास मोठी चालना मिळू शकते. हे ओळखण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली, तरच ते उत्तम संशोधक बनू शकतील.'





कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. उदय राजहंस यांनी स्नेहमेळाव्याचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांच्या माध्यमातून आपले नेतृत्वगुण, संवादकौशल्य आणि एकूणच व्यक्तिमत्त्व विकास साधावा, असे मार्गदर्शन केले.याप्रसंगी अॅड. होमेश्वर रोकडे यांनी राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे संस्थापक श्रद्धेय शिक्षणमहर्षी बापूसाहेब लाखनीकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या आठवणी सांगितल्या.

उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगंबर कापसे यांनी केला. स्नेहमेळाव्याचा आढावा महाविद्यालयाच्या छात्रसंघ अध्यक्षा कु. समीक्षा गिरीपुजे हिने आपल्या अहवाल वाचनातून मांडला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन स्नेहमेळावा संयोजक डॉ. धनंजय गिरीपुजे यांनी केले.

स्नेहमेळाव्याच्या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे विश्वस्त शिवलाल रहांगडाले होते. तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषद सदस्या डॉ. मनीषा निंबार्ते, मुरमाडीचे सरपंच श्री. शेषरावजी वंजारी तसेच सावरीचे माजी सरपंच श्री. भागवतजी नान्हे उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून स्नेहमेळाव्यानिमित्त आयोजित विविध स्पर्धांतील विजेत्यांना बक्षिसांचे वितरण केले. समारोपीय कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ. धनंजय गिरीपुजे यांनी तर आभार प्रदर्शन छात्रसंघ सचिव कु. राजश्री देशमुख हिने केले. स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने विविध स्पर्धा तसेच उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथालय विभागातर्फे आयोजित ग्रंथप्रदर्शन तसेच गृहअर्थशास्त्र विभागातर्फे आयोजित पाककला प्रदर्शनाला उपस्थित मान्यवरांनी भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

राष्ट्रीय सेवा योजना , राष्ट्रीय छात्रसेना विभागातील विद्यार्थी, सर्व प्राध्यापकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे स्नेहमेळावा यशस्वीरीत्या पार पडला. स्नेहमेळावा संयोजक डॉ. धनंजय गिरीपुजे व प्रा. सुरेश केदार यांनी सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले.

## आज धान भरडाई बाबत बैठक

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा:** शासकिय आधारभुत किंमत खरेदी योजना खरिप हंगाम २०२५-२६ अंतर्गत धान भरडाई करीता पुर्व तयारीबाबत आढावा बैठक बुधवार दि. ४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ वाजता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजीत करण्यात आली आहे. या बैठकीला सबंधीतांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा पणन अधिकारी सुधीर पाटील यांनी केले आहे.

## विष प्राशन केल्याने एकाचा मृत्यू

**भंडारा :** लाखांदूर तालुक्यातील दहेगाव येथील कैलास उरकुडा गोंडाणे (५०) याने दि. ३० जानेवारी रोजी उंदिर मारण्याचे विषारी औषध प्राशन केले. प्रकृती बिघडल्याने त्याला त्याच्या कुटुंबियांनी ग्रामीण रुग्णालय लाखांदूर येथे नेण्यात आले. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने प्राथमिक उपचारानंतर त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे त्याचेवर उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला.

# भदन्त आनंद कौशल्यायन जयंती उत्साहात

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** डॉ. भदन्त आनंद कौशल्यायन जयंतीनिमित्त शनिवार, ३१ जानेवारीला बोधिचेतिय संस्थान, खुटसावरी मार्ग, राजेगांव (एमआयडीसी) येथील डॉ. भदन्त आनंद कौशल्यायन परिसरात डॉ. भदन्त धम्मदीप महाथेरो यांचा पुञ्ञानुमोदन, गुणानुस्मरण व धम्मदेशना सह विविध कार्यक्रम उत्साहात पार पडले.

यावेळी भदन्त बोधीरत्न, मेत्तानंद, सुगत, शिलभद्र, नागसेन, विनयबोधी, धम्मज्योती, रत्नसार, थूलनंदा, संघमित्रा, आम्रपाली, प्रज्ञागौतमी, रतनबोधी, शील, रतनसार आदी भिक्खू-भिक्खूणी उपस्थित होते. सकाळी संघत्दक्खिणापूजा, अस्थिकलश परिक्रमा व पालि सुत्त पठण झाले. नंतर डॉ. भदन्त धम्मदीप महाथेरो यांच्या बुद्धधम्म प्रचारातील योगदानावर धम्मदेशना झाली. भदन्त बोधीरत्न, शिलभद्र, धम्मज्योती यांनी तथागत गौतम बुद्ध व महाथेरो यांच्या कार्यावर मार्गदर्शन केले. भिक्खु संघाला भोजनदानानंतर उपासक-उपासिकांना भोजन दिले.

दुपारी ४ वाजता तनुजा नागदेवे यांच्या संचालनात समाजप्रबोधन कार्यक्रम सादर झाला. शुभारंभप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य अस्मिता डोंगरे, पोलिस निरीक्षक सुभाष बारसे, सरपंच ज्योती







नंदेश्वर, प्रदीप वासनिक, साहित्यिक अमृत बन्सोड, सुरेंद्र बन्सोड, अचल मेश्राम, कुंजन शेंडे, युवराज रामटेके, वनविभागाचे सोमकुवर उपस्थित होते. रात्री कव्वाल सुरज आतिष यांचा बहारदार समाजप्रबोधन कार्यक्रम झाला. त्याचा शुभारंभ रोशन जांभुळकर, ज्ञानचंद जांभुळकर, प्रदीप वासनिक, अचल मेश्राम यांनी केला.

**आरोग्य शिबिराचा ६३ जणांनी घेतला लाभ**

आयोजित सोहळ्यादरम्यान धारगाव आरोग्य केंद्राच्या वतीने आरोग्य शिबिर भरले. यात उपासक-उपासिकांनी बीपी व शुगर तपासणी केली. जवळपास ६३ जणांनी लाभ घेतला. डॉ. सविता मालडोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य सेविका दीक्षा शेंडे, आशा वर्कर सुजाता साखरे व आरोग्य चमूने सहकार्य केले. सिकलसेलवर जनजागृतीही झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धर्मेंद्र बडोले, राजकुमार वाहने, अमरदीप बोरकर, संघदीप भोयर, महेंद्र तिरपुडे, विजय खोब्रागडे, विनोद बोरकर, नरेश साखरे, सुरेंद्र बन्सोड, धनंजय रामटेके, कुंजन शेंडे, नंदकुमार साखरे, डॉ. इलमकर, अनमोल कांबळे, सुधीर सुखदेवे, सज्जन रामटेके, शिवराम शेंडे, दिलीप बडोले, अंकित वासनिक, प्रदीप वासनिक, कल्पना रामटेके, अंतकला सुखदेवे, ज्ञानपाल बडोले, राजकपूर बांबोर्डे, नितेश टेंभुर्णे, रितेश रामटेके, भूपेंद्र रामटेके, मनोज वासनिक यांच्यासह माडगी, टेकेपार, खुटसावरी, राजेगांव, वाघबोडी, खुर्शिपार, गुंथारा व परीसरातील उपासक-उपासिकांनी सहकार्य केले.

# श्रीक्षेत्र गायमुख येथील पाण्याचे प्राचीन टाके बुजविले,भक्तांमध्ये रोष

- भक्तांच्या आस्थेवर प्रहार
- बजरंग दल, विश्वहिंदू परिषदेचे ५ फेब्रुवारी पासून आंदोलन
- संघटनेने दिला चलो गायमुख चा नारा

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**तुमसर :** तालुक्यातील श्री क्षेत्र गायमुख येथील भाविकांचे श्रद्धास्थान असलेले पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत असलेले प्रमुख प्राचीन टाके काही माथेफिरूंनी रात्री च्या सुमारास बुजविले. या प्रकाराने महादेव भक्तांच्या आस्थेवर आघात झाला आहे. भाविकांमध्ये प्रचंड रोष प्रसरला आहे. धार्मिक भावना दुखावले आहेत. या गंभीर धार्मिक प्रश्नाला घेऊन बजरंग दल विश्वहिंदू परिषद पाच फेब्रुवारीपासून भीषण आंदोलन उभारण्याचा निर्धार केला आहे. यासंदर्भातील एक निवेदन तुमसर येथील तहसीलदारांना देण्यात आले.







महाशिवरात्रीनिमित्त श्रीक्षेत्र गायमुख येथे मोठी यात्रा भरते. या यात्रेत महाराष्ट्र सहित मध्य प्रदेशातून लाखोंच्या संख्येत भाविक येतात. या ठिकाणी गायमुख नाव ज्याच्यामुळे आहे. त्या गायीच्या मुखातून पडणारा नैसर्गिक पाण्याच्या प्रवाह काही माथेफिरूनी रात्रीच्या सुमारास तोडफोड करून बुजविला. पाण्याचे टाक्या सोबत धार्मिक मूर्तीची विटंबना सुद्धा मोठ्या प्रमाणात झालेली आहे.

यामुळे शेकडो वर्षापासून सतत वाहणारा हा प्रवाह आज बंद पडलाय. यामुळे लाखो भाविकांच्या आस्थेला जबर धक्का बसला आहे. त्यामुळे धार्मिक भावना उफाळून आल्या आहेत. असंतोष पसरला आहे. या संदर्भात बजरंग दल विश्व हिंदू परिषद तुमसरच्या पदाधिकाऱ्यांनी पाच फेब्रुवारी पासून तुमसर तालुक्यातील श्रीक्षेत्र गायमुख येथे भीषण आंदोलन उभारण्याच्या निर्धार केला आहे. यासाठी चलो गायमुख चे आवाहन करण्यात आले आहे.

शेकडो वर्षापासून श्रीक्षेत्र गायमुख येथे प्राचीन महादेवाचे मंदिर अस्तित्वात आहे. या ठिकाणी नैसर्गिक रित्या डोंगरातून एक पाण्याचा प्रवाह गाईच्या मूर्तीच्या मुखा मधून टाक्यांमध्ये प्रवाहित होत होता. सदर टाके काही माथेफिरुंनी प्राचीन मूर्तीची विटंबना व तोडफोड करून रात्रीच्या सुमारास बुजविल्याचे सांगितले जाते. सदर टाक्याच्या पाण्याचां आसपासचे गावातील लोक तसेच शिवरात्री निमित्त येणारे भाविक याचा उपयोग करीत होते. परंतु सदर टाके बुजवण्यात आल्याने भाविकांच्या आस्तेवर आघात झाला आहे. आसपासच्या परिसरातील नागरिकांच्या पाण्याच्या समस्या सुद्धा मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. या संदर्भात बजरंग दल व विश्व हिंदू परिषदेच्याविषय कार्यकर्त्यांनी स्थानिक अधिकाऱ्यांच्या व पोलीस विभागाच्या नजरेत सदर बाब आणून दिली. परंतु अजून पावते कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत बुजविण्यासाठी मोठ्या प्रमाणात आसपासच्या भागातील गौण खनिजाची चोरी करण्यात आली हे विशेष.

गायमुख येथील महादेवाचे मंदिर व परिसर तसेच नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत हे महाराष्ट्र शासनाच्या व केंद्र शासनाच्या प्राचीन स्मारक आणि पुरातत्व स्थळे आणि अवशेष कायदा - १९५८, पुरावशेष आणि कलाकृती कायदा - १९७२, केंद्रीय जलनीती, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम -१९६६ चे सपशेल उल्लंघन करण्यात आले आहे. श्रीक्षेत्र गायमुखच्या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये जैवविविधता आढळते. पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत बंद झाल्याने जैव विविधता सुद्धा धोक्यात आलेली आहे.

येत्या ५ फेब्रुवारी पर्यंत बुजविण्यात आलेले पाण्याचे स्त्रोत पूर्ववत न झाल्यास. तसेच यात्रेला व भाविकांच्या आस्थेला गालबोट लावत पाण्याचे टाके बुजविणाऱ्या माथेफिरूवर कडक कारवाई करीत गुन्हे दाखल करण्यात यावे. संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करावी. अन्यथा बजरंग दल भीषण आंदोलन उभारेल असा इशारा तुमसर च्या तहसीलदारांना एका निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

यावेळी बजरंग दल, विश्व हिंदू परिषदेचे योगेश बूचे, मुन्ना पुंडे, अजय मोहने, अर्पित जयस्वाल, प्रमोद चावटकर, शांताराम कटरे, गोलू पोटभरे, शुभम चकोले, वैभव डुंबरे, सुधीर नेमा, एडवोकेट अभय मिश्रा, रोशन फंदी, दिनेश तुरकर, दुर्गेश पटले, सचिन चौधरी, पंकज शुक्ला यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

